पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

### प्रेस नोट दि.२१/०९/२०१९
### दि.२०/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६५८/१९,भादविक ३०२,२०१,३४ |
| **फिर्यादी** | संदिप देवकर, पोलीस नाईक,नेमणुक-लोणी काळभोर,पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, |
| **आरोपी** | १) अशोक संतोष अडवाणी, वय २२ वर्ष, रा. भारतनगर, पिंपरी रेल्वे स्टेशन नाणेकर चाळ, पुणे. २) अक्षय दिलीप पवार, वय १९ वर्ष, रा. सोनार आळी, वरवंड, ता. दौंड, जि. पुणे. ३) विजय संतोष पवार, वय १९ वर्ष, रा. सोनार आळी, वरवंड, ता. दौंड, जि. पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/०९/२०१९ रोजी रात्रौ ०२/०० वाजताचे सुमारास सादल बाबा चौक ते संगमवाडी रोडवरील, सादलबाबा चौकातून संगमवाडीकडे जाणारे रस्त्यावरील बस स्टॉप जवळ, रोडचे पुर्व बाजुचे फुटपाथवर संगमवाडी,येरवडा, पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम १)विजय संतोष पवार, व मयत इसम नामे-भारत राजु बढे, रा. कासारवाडी, पुणे यांचेत सुमारे १५ दिवसांपुर्वी आंबेडकर चौक पिंपरी पुणे येथे दारु पिवून झालेले भांडणाचा राग मनात धरुन,यातील नमुद इसम नामे १) अशोक संतोष अडवाणी, २) अक्षय दिलीप पवार, ३) विजय संतोष पवार, यांनी संगणमत करुन,दिनांक २०/०९/२०१९ रोजी मध्यरात्री ०२/०० वाजताचे सुमारास सादलबाबा चौक ते संगमवाडी रोडवर, सादलबाबा चौकातून संगमवाडीकडे जाणारे रस्त्यावरील बस स्टॉपजवळ, रोडचे पुर्व बाजुचे फुटपाथवर संगमवाडी येरवडा पुणे येथे भारत राजु बडे याचे डोक्यात सिमेंट ब्लॉक व काळे कडाप्पाचे तुकडयाने मारुन तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन,गंभीर जखमी करुन,त्याचा खुन केला व त्यानंतर त्याचे प्रेत कोठेतरी टाकून देण्याकरीता त्यांचेकडील होन्डा शाईन मोटार सायकलवर प्रेत मध्यभागी बसवुन पुणे सोलापुर हायवे रोडवरील थेऊर फाटा जवळील बँक ऑफ बडोदा शेजारील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयाचे मोकळया जागेत नेवून टाकून देवून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. (सदर बाबत लोणी काळभोर पो. स्टे. कडील पो.ना. संदीप सुरेश देवकर यांनी नमुद आरोपींविरुध्द भादवि कलम ३०२,२०१,३४ प्रमाणे सरकारतर्फे फिर्याद दिल्याने लोणी काळभोर पो स्टे येथे गु.रजि.नं. ००/२०१९ भादंवि कलम ३०२,२०१,३४ अन्वये गुन्हा नोंद होवून येरवडा पो.स्टे.ला वर्ग केला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.बी.बनसवडे ७८४३०९३७०६ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ८११/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | प्रमोद जोग, वय- ६१ वर्षे, रा. औंध, पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०९/२०१९रोजी पहाटे ०३/३० ते दिनांक १९/९/२०१९ रोजी रात्री १२/३० वा. चे दरम्यान आशियाना पार्क नं.०१ गायकवाड पेट्रोल पंपासमोर, औंध, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहते घर कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून, बेडरूम मधील लोखंडी कपाटातील ५ लाख रु. रोख रक्कम व सोन्या-चांदिचे दागिने असा एकुण ५ लाख ८१ हजार रु. किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संदिप चव्हाण ९७६३९७६७१३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**